# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. २३५/२०२६**

**विषय :- राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (National Pension System) करिताची कार्यशाळेबाबत.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधीत शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांस कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आस्थापनेतील शासनमान्य विविध पदांवर माहे नोव्हेंबर, २००५ नंतर रुजू झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांस शासन धोरणानुसार नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (New Defined Contribution Pension System-DCPS) लागू करण्यात आलेली होती. त्यानंतर सदर योजना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमध्ये (National Pension System-NPS) वर्ग करण्यात आलेली आहे. सदरच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या संदर्भातील माहिती तसेच सर्व शंकांचे निरसन होण्याकरिता मा.सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालयाकडून खालील नमूद दिवशी शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांचेकरिता विद्यापीठामध्ये कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबंधीतांनी सदर कार्यशाळेस उपस्थित रहावे.

**कार्यशाळेचा तपशिल खालीलप्रमाणे :**

| दिनांक | वेळ | कार्यशाळेचे ठिकाण |
|---|---|---|
| २८/१०/२०२६ | दुपारी १२.०० ते ०१.३० पर्यंत | "स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सभागृह"<br>इरावती कर्वे सामाजिक शास्त्र संकुल<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे |

**(प्रा.(डॉ.) प्रफुल्ल पवार)**
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
जा.क्र. : एएन/ 3947
दिनांक : 24 OCT 2026

**सोबत :-** वरीलप्रमाणे.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा

यांना विनंती की, सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधीत शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.